IMPACT FACTOR SJIF 2019-6.380 ISSN 2319-4766

SRJIS

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Special Issue of
An International, Peer Reviewed & Referred

## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN-MAR,2020,V-8/46

Editor-In-Chief
Prin. Dr. G. N. Shinde

Editor
Dr. P. R. Muthe

Co-Editors
Dr. D. D. Bhosale
Dr. D. A. Pupa



| | | |
|---|---|---|
| 30 | **जागतिकीकरणाचा भारताच्या व्यवहारतोल आणि विदेशी चलसाठयावर झालेल्या परिणामाचे विश्लेषण**<br>*प्रा.डॉ.डी.डी.भोसले* | 143-145 |
| 31 | **जागतिकीकरणाचे अनिष्ट परिणाम : शेतकरी आत्महत्या**<br>*डॉ.संजय पांडुरंगराव काळे* | 146-148 |
| 32 | **जागतिकीकरण आणि कुटूंबसंरचना : एक अध्ययन**<br>*डॉ.बी.आर.भोसले* | 149-152 |
| 33 | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि जागतिकीकरण**<br>*प्रा. डॉ. बी. जी. राठोड* | 153-158 |
| 34 | **जागतिकीकरणामध्ये आर्थिक विकासाच्या दृष्टिकोणातुन पर्यटनाचे महत्व**<br>*डॉ.विजया साखरे* | 159-162 |
| 35 | **शेतकऱ्यांच्या आत्महत्या : नवीन आर्थिक धोरणाचा परिणाम**<br>*प्रा.डॉ.जितेंद्र पांडुरंगराव काळे* | 163-165 |
| 36 | **जागतिकीकरण व ॲग्रीकल्चर कमोडीटी ट्रेड**<br>*शिवराज भानुदासराव चव्हाण व डॉ. आर. के. राऊत* | 166-170 |
| 37 | **बँक आणि वित्तीय क्षेत्रातील सुधारणा**<br>*प्रा. माधव मंदेवाड व नंदा संतूका चारलवाड* | 171-179 |
| 38 | **जागतिकीकरण आणि चलनवाढ**<br>*कमलकिशोर शिवाजी तोडे* | 180-183 |
| 39 | **जागतिकीकरणाचा लघुउद्योगावर झालेला परिणाम**<br>*प्रा.डॉ. स्वाती कुरमे* | 184-185 |
| 40 | **भारतीय कृषी क्षेत्र आणि जागतिकरण**<br>*प्रा. गोरे के.जी.* | 186-190 |
| 41 | **जागतिकीकरण आणि भारतातील आर्थिक विषमता**<br>*प्रा.देशमुख नयना निवृत्तीराव* | 191-195 |
| 42 | **जागतिकीकरण आणि भारतीय कृषी क्षेत्र**<br>*डॉ.विजय भोपाळे* | 196-200 |
| 43 | **जागतिकीकरणाचा भारतीय कृषि क्षेत्रावरील परिणाम**<br>*प्रा. डॉ. शिवराज दिगंबरराव आवाळे* | 201-204 |
| 44 | **जागतिकीकरणाचे भारतीय शेती क्षेत्रावरील परिणाम**<br>*डॉ. अनिल बालाजीराव चिलपिंपरे* | 205-206 |
| 45 | **यवतमाळ जिल्ह्यातील शेतऱ्यांच्या आत्महत्या : चिंतन आणि उपाय**<br>*[illegible]सरे अभय विष्पू व सोनटक्के प्रशांत नाराय ण राव* | 207-208 |

# जागतिकीकरणाचे अनिष्ट परिणाम : शेतकरी आत्महत्या

**डॉ.संजय पांडुरंगराव काळे**

प्रमुख, अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदु महाविद्यालय, भोकर जि.नांदेड

**प्रस्तावना:—**

जागतिकीकरणाचा स्विकार भारताने केल्यानंतर शेतीच्या उत्पादनखर्चात वाढ झाली परंतु शेतीमालाला उत्पादनखर्चावर आधारित किंमत मिळु शकली नाही. त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थिक गणित बिघडत गेले. दुसरीकडे बाजारपेठेत अनेक वस्तू सहजरित्या उपलब्ध झाल्यामुळे व अनुकरण प्रीयतेमुळे कुटुंबाच्या उपभागखर्चात वाढ झाली. एकीकडे उत्पन्न कमी आणि खर्च जास्त यामुळे शेतकरी कर्जबाजारी होत गेला सततची नापीकी, कर्जबाजारीपणा, उत्पादन व उपभोग खर्चात झालेली वाढ याचा एकूण परिणाम शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला. ज्यामुळे नव्वदच्या दशकानंतर म्हणजेच जागतिकीकरणानंतर शेतकरी आत्महत्येमध्ये वाढ झाल्याचे चित्र दिसून येते.

सदरील शोधनिबंधात भारतातील शेतकरी आत्महत्याची कारणे व उपाययोजना व संबंधीचा अभ्यास करण्यात आला आहे.

**आत्महत्या म्हणजे काय?**

"व्यक्तीचे स्वत: केलेल्या ज्या—ज्या सकारात्मक अथवा नकारात्मक कृतीची परिणती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या व्यक्तीच्या मृत्युत घडून येते, असे सर्व मृत्यु म्हणजे आत्महत्या होय"—दुर खिमने

'एखादी कमकुवत मनाची व्यक्ती आर्थिक, सामाजिक, कौटूंबिक आणि राजकीय कारणातुन निर्माण झालेल्या नैराश्यातून अकाली आपली जीवनयात्रा संपवते, त्याला आत्महत्या असे मानले जाते.' ही आत्महत्या गळफास घेऊन, विष प्राशन करुन, स्वत:ला पेटवून घेऊन किंवा रेल्वेखाली, विहीरीत, तलावात उडी मारुन करते.

जीवंत राहण्यासाठी आवश्यक असणारी एकही प्रेरणा व मदतीचा हात जेव्हा पुढे येत नाही. तेव्हा व्यक्ती आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलते.

**भारतातील शेतकरी आत्महत्या :—**

भारतात आत्महत्येचा अभ्यास १९६० नंतर सुरु झाला. राष्ट्रीय पातळीवर आत्महत्येच्या नोंदी, संख्यात्मक आकडेवारी, अहवाल, इत्यादीचे प्रकाशन "Central Bureau of Police Investigation and Research" या संस्थेने १९६५ पासुन सुरु केले.

भारतात सन १९९५ ते २०१३ या कालावधीत २,८४,६९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. यामध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश ही राज्य आघाडीवर आहेत. देशातील जवळपास राज्यात शेतकरी आत्महत्या होत आहेत. एवढया मोठया संख्येने

एखादा वर्ग आत्महत्या करतो ही बाब देशाच्या दृष्टीने भूषणावह नाही. शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्यांनी समाज, शासन आणि धोरणकर्त्यासमोर अनेक प्रश्न निर्माण केले आहेत.

सन १९९१ पासुन जागतिकीकरण, उदारीकरणाला खऱ्या अर्थाने भारतात सुरुवात झाली. नवीन आर्थिक धोरणामुळे एका बाजूने कृषी क्षेत्रातील गुंतवणुक व आर्थिक संस्थांकडून कर्जपुरवठा घसरल्यामुळे कृषी क्षेत्राच्या अडचणीत भरच पडली आहे. मुक्त आयात धोरणाबरोबरच शेती अनुदानात कपातीचे धोरण यामुळे शेती अर्थव्यवस्था अधिकच संकटात सापडली आहे.

**शेतकरी आत्महत्येची प्रमुख कारणे :—**

१) तीन ते चार वर्षात एकदा किंवा दोनदा नापीकीची अवस्था निर्माण होते. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनाचे आर्थिक गणित चुकते. पावसावरील अवलंबित्व हे शेतकऱ्यांचे शेती उत्पादन घटण्याचे व आर्थिक गणित चुकण्याचे मुख्य कारण आहे.

२) कृषी आदानाच्या वाढत जाणाऱ्या किमती, ज्यामुळे शेतकऱ्यांचा शेती उत्पादन खर्च वाढत चालला आहे. कृषी आदानाच्या वाढलेल्या किंमती व उत्पादन खर्चावरील आधारीत शेतीमालाला भाव न मिळाल्यामुळे शेतकऱ्याचे उत्पन्न वाढले नाही.

३) शेती व्यवसाय करण्यासाठी लागणारा भांडवल पुरवठा करण्यात भारतातील बँकिंग व्यवस्था कमी पडली आहे. स्वस्तदराने वेळेवर कर्जपुरवठा न झाल्यामुळे भारतीय शेतकरी प्रचंड व्याजदर असलेल्या सावकाराच्या जाळयात अडकला. त्यातुन तो बाहेर पडु शकला नाही.

४) भारतातील केवळ ३५ टक्के शेतजमीन सिंचनाखाली आहे. उर्वरित ६५ टक्के शेतजमीन पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीव्यवसाय अनिश्चित बनला आहे.

५) एकच पीक पुन्हा घेण्याचा फसलेला प्रयोग हे ही शेतकऱ्याचे उत्पन्न घटण्यास व कर्जबाजारीपणा वाढवण्यास जबाबदार घटक आहे.

६) सामाजिक प्रतिष्ठेपायी करण्यात येणारा खर्च, हुंडापध्दतीसारख्या अनिष्ठ प्रथा यामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत गेला. ज्यातून त्याला बाहेर पडता आले नाही.

७) शेतजमीनीचे होत गेलेले तुकडीकरण यामुळे शेतीव्यवसाय किफायतशीर राहिला नाही. ज्यामुळे लहान व मध्यम शेतकऱ्यामध्ये आत्महत्येचे प्रमाण अधिक वाढले आहे.

**उपाययोजना :—**

१) ग्रामीण भागात बँकिंग व्यवसायाचे जाळे उभारुन शेतकऱ्यांना स्वस्तदराने कर्जपुरवठा झाला पाहिजे, ज्यामुळे त्यांना सावकाराच्या जोखडातून मुक्त करता येईल.

२) कृषीमालाला उत्पादन खर्चावर आधारीत मुल्य प्राप्त झाले पाहिजे. त्यासाठी आधारभुत किमतीत वाढ करुन हमी भाव दिले गेले पाहिजे.

३) कृषी उत्पादनखर्च कमी करण्यासाठी कृषी आदाने खरेदीसाठी वाढीव अनुदान दिले गेले पाहिजे.

४) शेतीचे पावसावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी जलसिंचनाच्या सुविधेत वाढ करणे आवश्यक आहे.

ISSN: 2319-4766

५) सामाजिक चालीरिती व रुढी परंपरावर होणारा अवास्तव खर्च कमी केला पाहिजे.

**समारोप :—**

शेतीपिकाच्या उत्पादनखर्च व हाती येणारे उत्पन्न यातील तफावतीमुळे शेतकरी कर्जबाजारी होत गेला. या कर्जामुळे त्रस्त होऊन शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याच्या घटना केवळ महाराष्ट्रातच नाही, तर साऱ्या देशभरात घडल्या आहेत. १९९५ ते २०१४ या काळात देशातील तीन लाखापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले.^या दहा वर्षाच्या काळात ११ हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एका सर्वेनुसार आत्महत्या करणाऱ्यामध्ये ३१ ते ५० या वयोगटातील प्रमाण जवळपास ५५ टक्के आहे, म्हणजे आत्महत्या करणाऱ्यामध्ये तरुण शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. एवढया मोठया संख्येने एखादा वर्ग आपली जीवनयात्रा अकाली संपवतो हे देशाच्या व समाजाच्या दृष्टीने भुषणावह नाही. म्हणून शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी शासकीय व सामाजिक पातळीवर एखादा कृतीकार्यक्रम हाती घेणे गरजेचे आहे. तसेच शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी त्यांच्या कुटूंबातील व्यक्तीचीही भूमिका तीतकीच महत्त्वाची आहे. कोणताही व्यक्ती एकदम आत्महत्येस प्रवृत्त होत नाही. तो अगोदर नैराश्येने ग्रासलेला असतो. ज्यामुळे आपली जीवनयात्रा संपवण्याचा वारंवार विचार तो करीत असतो. या नैराश्यतेच्या गर्तेतून बाहेर काढण्याची सर्वात महत्त्वाची जबाबदारी त्याच्या कुटूंबाची असते. कारण त्यांनाच सर्वात प्रथम त्याची कल्पना असते. एकंदरीत, शासन, समाज व कुटूंब यांच्या पातळीवर योग्य ते प्रयत्न झाल्यास शेतकरी आत्महत्या रोखण्यास यश मिळु शकले. शेतकरी जिवंत राहिला तरच देश जीवंत राहील. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असुन म.गांधी यांनी शेतीस भारतीय अर्थव्यवस्थेचा आत्मा मानले आहे.

**संदर्भ सूची :—**


१) *सतिश गव्हाणे (२०१२) "कृषी क्षेत्रातील पेचप्रसंग आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या", चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प.११.*

२) *सकाळ (१३ जानेवारी २०१५), विस्तारतीय आत्महत्यांचा परीघ*

३) *सकाळ (२८ फेब्रु.२०१६) दिवसाला तीन शेतकऱ्यांनी जीवन संपवले.*

४) *दि.व्यं. जहागिरदार (२०११) 'आर्थिक जगत' कौटिल्य ज्ञान प्रबोधनी, अमरावती.*

५) *कुंजीर/विजय (मे) "भारतीय शेती वाटचाल आणि आव्हाने," Unique Bulletin.*